INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 5.828 (SJIF 2022)

# महात्मा फुले यांचे शैक्षणिक विचार व कार्य : एक अभ्यास

## (Educational Thoughts and Works of Mahatma Phule: A Study)

**डॉ. दत्ता एम. तंगलवाड**
सहयोगी प्राध्यापक तथा समाजशास्त्र विभाग प्रमुख,
महिला महाविद्यालय, गेवराई
ता. गेवराई, जि.बीड (महाराष्ट्र, भारत)

**DOI No.** 03.2021-11278686 **DOI Link ::** https://doi-ds.org/doilink/06.2022-77628443/IRJHIS2206021

**प्रस्तावना :**

आधुनिक कालखंडातील समाज प्रबोधनाच्या प्रक्रियेत आपल्या विचार व कार्यातून भारतीय समाजात नवचैतन्य निर्माण करून सामाजिक परिवर्तनाच्या नव्या पर्वाला सुरुवात झाली. मानवी मूल्यांची जोपासना करणाऱ्यांचा एका वैचारिक प्रवाहाला प्रवाह निर्माण झाला. व्यक्तिवाद, मानवतावाद, न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता हे शब्द मध्ययुगीन कालखंडातील माणसाच्या कानावर येऊ लागले. त्यात भारतातील थोर समाज सुधारकाचे योगदान अनन्यसाधारण असे आहे. अज्ञान, निरक्षरता, दारिद्र्य, भारतीय समाजावर धर्माचा असलेला प्रभाव, यामुळे सामान्य माणसाचे जीवन अंधकारमय झाले होते.भारतातील दलित आदिवासी भटके समाज यांच्यामध्ये दारिद्र्य पराकोटीला पोहोचलेले होते. देशात असलेली पराकोटीची आर्थिक विषमता, सामाजिक विषमता याचे मूळ कारण भारतीय समाजावर धर्माचा असलेला प्रभाव यामध्ये दिसून येतो. मनुस्मृतीतील थोतांड विचारांवर प्रहार करून देशातील सामाजिक आणि आर्थिक विषमता दूर करायची असेल, माणसाला माणूस म्हणून जगायचे असेल, समाजातील अनिष्ट चालीरीती, रूढी, प्रथा, परंपरा, कर्मकांड यातून भारतीय समाजाला बाहेर काढायची असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही. असे मत मांडणारे महात्मा फुले हे देशातील पहिले समाजसुधारक होते.

इतिहासाच्या पानावर शेकडो नावांची गर्दी असून या गर्दित देखील एक स्वयंप्रकाशित तारा होऊन गेला तो म्हणजे महात्मा ज्योतिबा फुले. भारतातील समग्र मानव जातीचे कल्याण करण्यासाठी अनेक महामानवानी आपले संपूर्ण आयुष्य वेचले. यामध्ये प्रामुख्याने राजाराम मोहन रॉय, स्वामी दयानंद सरस्वती, गोपाळ गणेश आगरकर, न्यायमूर्ती रानडे, ईश्वरचंद्र विद्यासागर, धोंडो केशव कर्वे, महात्मा ज्योतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव अतिशय आदराने घ्यावे लागते. हजारो वर्षापासून धर्माच्या नावाखाली अनेक सामाजिक बंधनात अडकलेल्या विविध जाती-जमातींना मुक्त करून त्यांना मोकळा श्वास घेण्याची स्वातंत्र्य बहाल

करण्याचा प्रयत्न या सर्व समाजसुधारकांनी केला. त्यापैकी केवळ महात्मा फुले यांच्या शैक्षणिक विचार व कार्याचा थोडक्यात आढावा या लघु शोधनिबंधामध्ये घेण्याचा आलेला आहे.

**समस्या सूत्रण :**

अर्वाचीन कालखंडातील भारतीयांच्या सामाजिक जीवनाची विस्कळीत झालेली घडी सुरळीत करून उत्तर वैदिक कालखंडात निर्माण झालेला जातिभेद वर्णभेद, स्त्रियांची दुय्यम स्थिती यावर प्रखर हल्ला चढवून समाज परिवर्तन घडवून आणण्यात महात्मा फुले यांचे योगदान मोलाचे आहे.म्हणून त्यांच्या शिक्षण विषयक विचार आणि कार्याचा आढावा या लघु शोधनिबंधामध्ये घेण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

**संशोधन विधान :**

**"महात्मा फुले यांचे शैक्षणिक विचार व कार्य: एक अभ्यास"** हा विषय घेऊन माहिती संकलित करून तत्कालीन परिस्थितीमध्ये महात्मा फुले यांनी समाजव्यवस्थेचा विरोधात जाऊन समाज परिवर्तनासाठी कशा प्रकारे कार्य केले. या बाबीचा आढावा या लघु शोधनिबंधात घेण्यात आलेला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१. मानवमुक्तीच्या लढ्यातील महात्मा ज्योतिबा फुले यांच्या शैक्षणिक विचार व कार्याच्या योगदानाचा आढावा घेणे.

२. महात्मा फुले यांनी पारंपारिक शिक्षण पद्धतीचे स्वरूप बदलून नवीन तत्वावर सर्वसमावेशक अशी निर्माण केलेली शैक्षणिक व्यवस्था अभ्यासणे.

**संशोधनाची गृहितके :**

कुठल्याही सामाजिक समस्या संदर्भात संशोधन करत असताना काही संभाव्य विधानाचे भविष्यकथन करावे लागते. जे आपल्या भावी संशोधनासाठी मार्गदर्शक तत्वे ठरतात. म्हणून प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधन कार्य करण्यापूर्वीच काही गृहीतकाची मांडणी पुढीलप्रमाणे करण्यात आलेली आहे.

१. महात्मा फुले यांच्या शैक्षणिक विचार व कार्यामुळे माणसाला माणूस म्हणून जगण्याची संधी निर्माण झाली.
२. महात्मा फुले यांच्या शैक्षणिक कार्यामुळे वैचारिक व सामाजिक परिवर्तन होऊन नवसमाज निर्माण होण्यास प्रेरणा मिळाली
३. महात्मा फुले यांनी आयुष्यभर केलेल्या परिश्रमाचे फळ विध्यामान भारतीय समाजातील जनमानसाला चाखण्यास मिळत आहेत.
४. पारंपरिक धर्म व्यवस्थेच्या विरोधात जाऊन महात्मा फुले यांनी दलित ,आदिवासी ,भटके शेतकरी यांना शिक्षण मिळाले पाहिजे यासाठी धरलेल्या आग्रहामुळे आज सर्व जाती धर्माचे मुले एकाच छत्राखाली शिक्षण घेताना दिसून येतात.

**संशोधन पद्धती :**

कोणत्याही सामाजिक संशोधन समस्येच्या संदर्भात संशोधन करीत असताना संशोधकाला कार्याला विशिष्ट चाकोरीतून माहिती संकलित करावी लागते त्यासाठी विशिष्ट संशोधन पद्धतीचा अवलंब करावा लागतो, तरच संकलन वस्तुनिष्ठ स्वरूपाचे होते. म्हणून प्रस्तुत संशोधनात संशोधनासाठी विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे.

**नमुना निवड पद्धती :**

**"महात्मा फुले यांचे शैक्षणिक विचार व कार्य: एक अभ्यास"** या विषयाच्या अनुषंगाने माहिती संकलित करण्यासाठी सहेतुक नमुना निवड तंत्राच्या आधारे तथ्य संकलन करण्यात आले. समग्र महात्मा फुले यांच्या विचार

व कार्यची मांडणी एका छोट्याश्या लघुशोधनिबंधामध्ये केवळ अशक्यप्राय आहे. म्हणून समग्राचा लहानात लहान भाग म्हणून महात्मा फुले यांचे केवळ शैक्षणिक विचार आणि कार्य या बाबींचा आढावा या ठिकाणी घेण्यात आलेला आहे.

**तथ्य संकलनाची साधने :**

प्रस्तुत संशोधनात माहिती संकलनासाठी संदर्भ ग्रंथ, नियतकालिके ,पुस्तके,विविध मासिके, इंटरनेट,तसेच निरीक्षण तंत्राचा अवलंब करण्यात आला.

**संशोधनाची क्षेत्रमर्यादा :**

प्रस्तुत संशोधनात केवळ महात्मा फुले यांच्या शैक्षणिक विचार व कार्याचा आढावा घेण्यात आला असून महात्मा फुले यांनी मांडलेल्या विविध विचारापैकी केवळ "शैक्षणिक विचार आणि त्यांचे कार्य" ही या संशोधनाची क्षेत्र मर्यादा आहे

**माहितीचे विश्लेषण :**

मानव मुक्तीचे संघर्ष यात्री, लोकशिक्षक, सामाजिक समतेचे खंदे पुरस्कारते, स्त्री,अस्पृश्यांचे उद्धारक, लेखक, विचारवंत, बहुजन नायक, महात्मा ज्योतिबा फुले यांचा जन्म ११एप्रिल१८२७रोजी पुण्यामध्ये झाला.परंतु त्यांचे मूळ गाव सातारा जिल्ह्यातील काटगुण हे होते. आजोबांच्या स्थलांतरामुळे त्यांना पुण्यात राहण्याची संधी भेटली. त्यांचे मूळ आडनाव गोऱ्हे होते. परंतु राज दरबारात फुले पुरवण्याचे कार्य त्यांचे आजोबा करत असल्यामुळे त्यांचे नाव फुले असे नामांतरीत झाले. आणि नंतर गोऱ्हे परिवार फुले नावाने ओळखला जाऊ लागला. बालवयात आईचे छत्र हरवल्यामुळे त्यांच्या मावस बहिणीने त्यांचा सांभाळ केला. गोविंदराव फुले हे निरक्षर होते, परंतु त्यांनी आपल्या मुलाला खूप शिकून मोठा बनवण्याचे स्वप्न मनामध्ये बाळगलेला होता. परंतु १८३४ ते १८३८ हा चार वर्षांचा त्यांच्या शिक्षणामध्ये खंड पडला परंतु गफार बेग मुन्शी आणि ख्रिस्त धर्मोपदेशक लिजीट यांच्या आग्रहावरून गोविंदराव फुले यांनी आपल्या मुलाला पुन्हा शाळेत घातले. आणि त्यांचे माध्यमिक शिक्षण १८२७ साली पूर्ण झाले. थॉमस पेन यांच्या The Right of man या ग्रंथाच्या वाचनामुळे थॉमस पेन यांच्या विचारांचा प्रचंड प्रभाव महात्मा फुले यांच्या जीवनावर पडला आणि त्याचे संपूर्ण जीवन बदलून गेले. समाज व्यवस्थेची विस्कळीत झालेली घडी सुरळीत करण्यासाठी त्यांनी नोकरी न करता समाज सुधारणेच्या चळवळीत भाग घेण्याचे ठरवले आणि तेथूनच खऱ्या अर्थाने त्यांच्या सामाजिक कार्याला सुरुवात झाली. स्त्री, दलित, शूद्रातिशूद्र बांधवांच्या उद्धारासाठी त्यांनी केलेल्या कार्यामुळे जनतेने त्यांना १८८८ मध्ये महात्मा ही पदवी बहाल केली.पैशाचा हव्यास न बाळगता तळागळातील माणसाच्या समाजप्रबोधनासाठी आयुष्यभर झटणारे एक महान समाजसुधारक म्हणून महात्मा फुले यांना संपूर्ण भारतच नव्हे तर जगातील वेगवेगळ्या ठिकाणी त्यांची ओळख आहे. महात्मा फुले यांना महाराष्ट्राचे काल मार्क्स असे म्हटले जाते. त्यांनी सामाजिक गुलामगिरीविरुद्ध बंड करून भारतीय समाजातील समाजक्रांतीचे आद्य जनक होण्याचा मान मिळवला. त्यांच्या विचाराला कृतीची जोड होती म्हणून सर्व भारतीय समाज आदराने त्यांना आजही महात्मा मानून नतमस्तक होतो.

**महात्मा फुले यांचे शैक्षणिक विचार व कार्य:-**

शिक्षणाचे महत्व पटवून सांगत असताना महात्मा फुले म्हणतात.......

**विद्येविना मती गेली**
**मतीविना नीती गेली**
**नीतीविना गती गेली**
**गतीविना वित्त गेले**
**वित्ताविना शूद्र खचले**
**इतके सारे अनर्थ एका अविद्येने केले.**

उपरोक्त ओळीतून शिक्षणाची महती महात्मा फुले यांनी सांगितलेले आहे. शिक्षणाच्या अभावामुळे बुद्धीचा विकास होत नाही, म्हणून मानवी जीवनात अनेक संकटाला तोंड द्यावे लागते शिक्षणा अभावी दारिद्र्यात जीवन जगावे लागते. व्यक्ती आणि समाजाची आर्थिक प्रगती होत नाही म्हणून शिक्षणाला अनन्यसाधारण असे महत्त्व आहे असे प्रतिपादन महात्मा फुले यांनी केले आहे.

**प्राथमिक शिक्षणाच्या संदर्भात हंटर कमिशनला निवेदन:**

तत्कालीन परिस्थितीत भारतातील राज्यकारभार इंग्रजांच्या ताब्यात होता. इंग्रजांना द्विभाषिक मनुष्यबळाची गरज होती परंतु त्या कालखंडात ज्ञान हे ब्राह्मणाची मक्तेदारी होती. म्हणून इंग्रजांनी कायद्याचे राज्य तयार करून नव विचार, नवीन तत्वज्ञान, नवीन मूल्यावर आधारित भारतीय समाज निर्माण करण्यास सुरुवात केली ०२ फेब्रुवारी १८८२ रोजी ब्रिटिश सरकारने भारतातील शिक्षण व्यवस्थेची पाहणी करून सुधारणा करण्यासाठी विल्यम हंटर यांच्या अध्यक्षतेखाली आयोग नेमला पण त्या आयोगाने फक्त उच्चवर्णीयांच्या शिक्षणाची सोय करून ठेवलेली होती. त्यामध्ये सुधारणा करण्यासाठी १६ऑक्टोबर १८८२रोजी महात्मा फुले यांनी हंटर कमिशन ला निवेदन दिली त्यात ते म्हणतात की,..........

१. बारा वर्षे वयापर्यंत सर्व जाती धर्माच्या मुलांना मोफत व सक्तीचे शिक्षण दिले पाहिजे.
२. आदिवासी जमातींना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी प्राधान्य दिले पाहिजे.
३. प्राथमिक शाळांना प्रांतिक सरकारचे अनुदान असावे.
४. प्राथमिक शिक्षणावर होणाऱ्या खर्चाची जबाबदारी नगरपालिकेने घ्यावी.
५. शाळेच्या कारभारावर सरकारचे नियंत्रण असावे.
६. शिक्षकांना प्रशिक्षण देऊन प्रशिक्षित करावे.
७. शिक्षकांना चांगले वेतन द्यावे ज्यामुळे समाजातील हुशार लोक या क्षेत्राकडे आकर्षित होतील
८. दलित, अस्पृश्य जातींना विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी शिष्यवृत्ती आणि वसतिगृहाची तरतूद करावी.

अशा प्रकारच्या सूचना करून त्याची अंमलबजावणी करण्याची विनंती केली.

**लॉर्ड मेकाॅले यांच्या शिक्षणाच्या झिरपत्या सिद्धांतावर टीका**:

भारतील उच्चवर्णीयांना शिक्षणाच्या प्रवाहात आणले तर ते तळागाळातील लोकांना शिकून समृद्ध बनवतील म्हणजे विकासाचे पाणी वरच्या जातीतून खालच्या जातीपर्यंत आपोआप पाझरत जाईल, अशा प्रकारचे मत लॉर्ड मेकाले यांनी मांडलेली होत. पण या विचाराला विरोध करून महात्मा फुले यांनी म्हटली की,जर देशाचा खरा विकास करायचं असेल तर तळागळातील जाती-जमातीं पासून शिक्षणाची खरी सुरुवात झाली पाहिजेत. म्हणून तळागाळातील लोकांच्या शिक्षणाचा आग्रह महात्मा फुले यांनी धरला. तसेच वेद पठणाचा अधिकार देखील सर्व जाती-जमातींना मिळाला पाहिजे असे मत त्यांनी मांडले.

**मुलींच्या शाळेची सुरुवात:**

शिक्षणाची दारे सर्वांना खुली करण्यासाठी १८२४ मध्ये अमेरिकन मिशनने पुणे, मुंबई मध्ये चालू केलेल्या शाळांना फारसा प्रतिसाद मिळत नव्हता. अहमदनगरच्या मिस फरारा या मशिनरी बाईने चालवलेल्या शाळेतून प्रेरणा घेऊन, महात्मा फुले यांनी स्त्री शिक्षणावरील बंदी मोडीत काढून सर्वप्रथम १८४८ मध्ये पुण्यातील बुधवार पेठेत मुलींची पहिली शाळा काढली. त्यानंतर ०३ जुलै १८५१ मध्ये आप्पासाहेब चिपळूणकर यांच्या वाड्यात एक शाळा काढली. याच शाळेत सावित्रीबाई फुले शेवटपर्यंत मुख्याध्यापक म्हणून कार्यरत होत्या. तर १७ सप्टेंबर १८५१ मध्ये रास्तापेठ येथे मुलींची शाळा काढली. स्वतःच्या घरात प्रोढ शिक्षण सुरू करून परिसरातील स्त्री-पुरुषांना रात्रीच्या वेळी शिक्षण देण्याची सुरुवात केली. त्यानंतर १८४८-१८५२ या कालावधीत पुणे आणि

परिसरात १८ शाळा सुरू करून त्या शाळेमध्ये ज्ञानदानाचे कार्य अहोरात्र चालू ठेवले. "दलित, अस्पृश्य आणि स्त्रियांना शिक्षण देऊन, पारंपारिक धर्म मोडण्याचे कार्य महात्मा फुले यांनी केलेले असल्यामुळे धर्ममार्तंडांचा त्यांना प्रचंड विरोध होता. महात्मा फुले यांचे वडील गोविंदराव फुले यांच्यावर दबाव टाकून महात्मा फुलेंना या कार्य पासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. लोकांच्या दबावामुळे एक तर समाजकार्य सोडा किंवा घर सोडा अशी अट महात्मा फुले यांच्या वडिलांनी ठेवल्यावर महात्मा फुले यांनी आपले घर सोडले, परंतु समाजसेवेचे स्वीकारलेले वृत्त त्यांनी सोडले नाही. त्यांचे समाजकार्य पाहून प्राचार्य मेजर कॅन्डी यांच्या हस्ते त्यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात केला.बहुजन समाज शिक्षण घेतला तर धर्मग्रंथांच्या आधारे आजपर्यंत आपण केलेले राज्य खलास होईल म्हणून धर्ममार्तंडांनी महात्मा फुलेंना संपविण्यासाठी मारेकऱ्यांना १००० रुपयाची सुपारी देऊन पाठवले. परंतु धोंडीबा कुंभार व सज्जन मांग यांनी महात्मा फुलेंना न मारता त्यांनी केलेल्या विचार व कार्याची माहिती घेतली असता महात्मा फुले हे आपल्यासारखेच दीनदलित गरिबांसाठी काम करताहेत. हे समजल्यानंतर त्यांनी आपल्या जिवनाच्या शेवटपर्यंत महात्मा फुलेंचे अंगरक्षक म्हणून कार्य केले. जर त्याठिकाणी महात्मा फुले यांना ठार मारले असते, तर आज भारतीय समाज समाजातील दलित, आदिवासी, भटके यांचे जीवन अत्यंत वाईट अवस्थेत असलेले आपणास पाहायला भेटला असता हे विसरून चालणार नाही.

**मराठा मुलांसाठी शाळा :**

जगन्नाथ सदाशिव हारे व सदाशिव बल्लाळ यांच्या मदतीने पुण्यातील बुधवारपेठेत मराठा जातीच्या मुलांसाठी स्वतंत्र शाळा स्थापन करण्यात आली. अत्यंत कठीण परिस्थितीतून अथक परिश्रमातून ही शाळा सुरू ठेवली. या शाळेत वाचन लेखन, व्याकरण, गणित, इतिहास-भूगोल इत्यादी विषयाचे धडे दिले जात असत.

**शेतकरी वर्गातील प्रशिक्षित शिक्षकांची नियुक्ती :**

देशातील दलित, अस्पृश्य, भटक्या जाती- जमातीच्या लोकांना शिक्षण देण्याचे काम ब्राह्मण लोकांकडे सोपवले तर समाजावरील आपल्या जातीची असलेले प्रभुत्व नष्ट होईल,म्हणून ते दलित अस्पृश्य व इतर मागासवर्गीय जातींना न्याय देऊ शकणार नाहीत, नव्हे तर चांगल्या प्रकारे शिक्षण पण देणार नाहीत. हे महात्मा फुले जाणून होते. त्यामुळे त्यांनी शेतकरी वर्गातील शिकलेल्या लोकांना प्रशिक्षित करून शिक्षक म्हणून नियुक्ती केली तर ते आपल्या जातीचे कल्याण व्हावे म्हणून सर्वांना प्रेमाने व आपुलकीने शिकवितील. ते बहुजन मुलांमध्ये मिसळून त्यांना ज्ञान देतील अशा प्रकारचे मत महात्मा फुले यांनी मांडले.

**क्षमता दृष्टीत व्यवसायिक शिक्षणावर भर :**

शिक्षण घेतल्यानंतर सर्वांनाच नोकरीच्या संधी मिळणार नाहीत, हे महात्मा फुले जाणून होते. त्यामुळे त्यांनी शिक्षणातून व्यवसायिक कौशल्य विकसित झाले पाहिजेत व व्यवहार ज्ञानाचा समावेश शिक्षणामध्ये असला पाहिजे असे मत मांडले. आणि सरकारला तशी विनंती केली. पण दुर्दैवाने आजही भारत देशातील शिक्षण पद्धती ही व्यवसायाभिमुख झालेली नाही. हे या शिक्षणव्यवस्थेचे मोठे दुर्दैव समजावे लागेल. ठराविक अभ्यासक्रमामध्ये व्यवसायिक शिक्षण दिले जाते परंतु व्यवसायिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण अजूनही झालेली नाही.

**अस्पृश्यांच्या मुलांसाठी स्वतंत्र शाळेची स्थापना :**

१८५१ मध्ये पुण्यातील नानाच्या पेटीत अस्पृश्यांच्या मुलांसाठी स्वतंत्र शाळा स्थापन केली. त्या काळात स्त्री, शूद्रांना शिक्षणाचा अधिकार नव्हता. धर्माच्या विरोधात जाऊन अस्पृश्य समाजाला शिक्षणाची दारे खुले करण्याचे मोठे कार्य महात्मा फुले यांनी केले परंतु धर्ममार्तंडांनी धर्म बुडाला, ईश्वर कोपला, आता हाहाकार माजेल, अशा प्रकारच्या खूळया समजुती समाजामध्ये पसरून अस्पृश्यांच्या मुलांना शाळेत येऊन नयेत म्हणून त्यांच्यावर दबाव टाकत, धमक्या देत. परंतु महात्मा फुले यांनी केलेल्या उद्देशामुळे पुन्हा शाळेत दलित अस्पृश्य मुलांची संख्या

वाढू लागली. दलितांना शिक्षणाचे महत्त्व समजले आणि अस्पृश्यांसाठी काढलेली शाळा यशस्वीरित्या चालू लागली. त्यानंतर महात्मा फुले यांनी शाळेची संख्यादेखील वाढवली व या सर्व शाळा उत्तमरित्या चालवल्या.

**शिष्यवृत्ती व वसतिगृहाची स्थापना :**

ग्रामीण भागातील दलित आदिवासी भटके विमुक्त जाती जमाती व कुणब्यांच्या मुलांना शिक्षण घेता आले पाहिजे, यासाठी हुशार व होतकरू मुलांच्या आर्थिक अडचणी सोडवण्यासाठी मदत व्हावी, राहण्याची व्यवस्था व्हावी म्हणून शिष्यवृत्ती ववसतिगृहाची स्थापना करण्याची शिफारस महात्मा फुले यांनी केली. एवढेच नव्हे तर शाळेतील १० अतिगरीब विद्यार्थी निवडून त्यांच्याकडून शिष्यवृत्ती अर्ज भरून घेऊन शिष्यवृत्तीच्या रुपाने त्यांना आर्थिक मदत देण्यास सुरुवात केली. तसेच सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून शाळेतील गरीब व होतकरू असलेल्या ०५% विद्यार्थ्यांना सर्व शैक्षणिक शुल्कात सवलत मिळवून देण्यासाठी इंग्रज शासनाला आदेश काढायला विनंती केली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर महात्मा फुले यांच्या या विचाराचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानात्मक तरतुदीमध्ये रूपांतर केले.या योजनेचा फायदा घेऊन आज देशातील लाखो दलित आदिवासी भटके विमुक्त जाती जमातीचे लोक शिक्षण घेत असताना आपल्याला दिसून येतात.

**विधवा व अनाथांचे शिक्षण :**

पुणे व पुणे परिसरातील विधवा परित्यक्ता, कुमारी मात, व अनाथ स्त्रिया, आणि मुले यांना निर्भय व स्वावलंबी बनवण्यासाठी त्यांना वेगवेगळ्या प्रकारचे शिक्षणदेऊन पायावर उभे करण्याचा प्रयत्न महात्मा फुले यांनी केला. समाजाकडून होणारी हेळसांड अवहेलना, शोषण आणि अत्याचार थांबवण्यासाठी खूप कष्ट घेतले म्हणूनच महात्मा फुले यांना आज अनाथांचे नाथ म्हणून ओळखले जाते.

**शेतकऱ्यांच्या शिक्षणासंबंधी महात्मा फुले यांचे विचार :**

भारत हा कृषिप्रधान देश असल्यामुळे कृषीला भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा म्हटले जाते. जर शेतकऱ्याचा मुलगा शिकला तरच तो उद्याचा आदर्श शेतकरी बनेल, म्हणून शेतकऱ्यांच्या मुलांनी शिक्षणावर भर दिला पाहिजे असा आग्रह महात्मा फुले यांनी धरला. ते आपल्या गुलामगिरी या ग्रंथामध्ये म्हणतात... "सावकार, भटजी, शेटजी यांच्याकडून शेतकऱ्यांची होणारी फसवणूक थांबवायची असेल तर शेतकऱ्यांच्या मुलांनी शिक्षण घेतले पाहिजे." हा उद्देश सर्व शेतकऱ्यांना समजल्यामुळे त्यांनी आपल्या मुलांना शाळेत पाठवण्यास सुरुवात केली आणि ग्रामीण भागात सुरू केलेल्या शाळानां बहराल्या.

**दलितांसाठी वाचनालयाची स्थापना :**

वाचनाने माणूस समृद्ध आणि आत्मनिर्भर बनतो म्हणून महात्मा फुले यांनी पुण्यातील दानशूर लोकांच्या मदतीने दलित मुलांच्या वाचनासाठी वाचनालयाची सुरुवात केली. शिक्षणाने माणूस जागरूक आणि समृद्ध बनतो. शिक्षण हे सर्वांगीण विकासाचे साधन आहे.म्हणून माणसाने निरंतर वाचन केले पाहिजे असे महात्मा फुले यांनी लोकांना पुन्हा पुन्हा पाठवून सांगले. त्यामुळे त्यांनी सुरू केलेल्या वाचनालयाला चांगला प्रतिसाद मिळाला.

**सारांश :**

महात्मा फुले हे एक कृतिशील विचारवंत होते. देशातील सामाजिक व आर्थिक विषमतेवर आधारित असलेली समाज व्यवस्था नष्ट करून समतेचे साम्राज्य पसरविण्यासाठी त्यांनी शैक्षणिक शाळा सुरू करून शिक्षणाचे महत्त्व लोकांना समजून सांगितले. शिक्षणातून न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता या मूल्यांची भारतीय जनमानसामध्ये रुजवणूक केली. स्त्री शूद्रांना शिक्षण देऊन त्यांच्या जीवनात नवचैतन्य निर्माण केले. आणि पुरोहित व धर्म मार्तन्दाचे पारंपारिक धार्मिक विचार समूळ नष्ट केले. मनुस्मुर्तीला विरोध केला.आज भारत देशाची एक राष्ट्र म्हणून जी पायाभरणी झालेली आहे,त्यात महात्मा फुले यांचे यांच्या शैक्षणिक विचाराचे अमूल्य असे योगदान आहे. शिक्षणातून समाज परिवर्तन घडून येते हे त्यांनी सिद्ध करून दाखवले. आज त्यांच्याच प्रयत्नांमुळे सर्व जातीधर्मांचे

मुले एकाच छत्राखाली शिक्षण घेत असलेले आपल्याला दिसून येतात. दलित आदिवासी भटके यांच्या सामाजिक, आर्थिक परिस्थितीत झालेल्या स्थित्यंतराचे सर्व श्रेय महात्मा फुले यांना जाते. म्हणून त्यांचे शैक्षणिक विचार आणि कार्ये जनमाणसासाठी अत्यंत मोलाचे आहेत हे सिद्ध होती.

**निष्कर्ष :**

१. महात्मा फुले यांनी शिक्षण सर्वांना व सक्तीचे आणि मोफत मिळण्यासाठी आग्रह धरल्यामुळे धर्माची पारंपारिक व्यवस्था कोलमडून पडली आणिधर्ममार्तंडांचा पारंपारिक धर्म बुडवून नवीन सामाजिक समतेवर आधारित समाज निर्माण केला.

२. भारतीय समाजव्यवस्थेचे जे विद्यमान स्वरूप आहे, त्यामध्ये फुले दांपत्याचे अतिशय मोलाचे योगदान आहे त्यांनी मांडलेल्या वैचारिक ठेवल्यामुळे

भारतातील दलित अस्पृश्य आणि कुणबी यांच्या जीवनात अमुलाग्र परिवर्तन झाले त्यांना माणसाला माणूस म्हणून जगण्याची संधी मिळाली.

३. महात्मा फुले यांनी सुरू केलेल्या शाळा वस्तीग्रह आणि शिष्यवृत्ती योजनेमुळे सर्वसामान्य कुटुंबातील मुलं आणि स्त्रियांना शिक्षणाची दारे खुली झाली आणि

याच योजनांना स्वातंत्र्यप्राप्तीनंतर संविधानात्मक स्वरूप प्राप्त झाले.आज देशातील लाखो विद्यार्थी या योजनांचा फायदा घेऊन ज्ञानार्जन करत असताना दिसून येतात.

४. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर शासनाने तयार केलेल्या विविध शैक्षणीक योजनांचा पाया हा महात्मा फुले यांच्या शैक्षणिक विचार आहे हे स्पष्ट होते.

५. भारतातील वेगवेगळ्या जाती जमातीचे लोक आज एकाच छत्राखाली शिक्षण घेत आहेत. याचे सर्व श्रेय महात्मा फुले यांच्या शैक्षणिक विचार आणि कार्याला जाते. देशातील धार्मिक, सामाजिक, आर्थिक क्षेत्रामध्ये झालेले आमूलाग्र परिवर्तन महात्मा फुले यांच्या विचार व कार्यामुळे फल आहे.

६. महात्मा फुले यांच्या शैक्षणिक विचार व कार्यामुळे शिक्षणाची गंगा दारोदारी पोहोचलेली दिसून येते.

**संदर्भ सूची :**

१. देशमुख मा.म., (१९९२),राष्ट्रनिर्माते, शिवभारत प्रकाशन, नागपूर.

२. कीर धनंजय, (१९९२), महात्मा ज्योतिबा फुले, पाप्युलर प्रकाशन, मुंबई.

३. नरके हरी, (२०१३), महात्मा फुले समग्र वांङ:मय, महात्मा ज्योतिबा फुले चरित्र साधने प्रकाशन समिती महाराष्ट्र शासन, मुंबई.

४. कटारे अनिल, (२०१३), आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद.

५. पाटील वा.भा. (२००९), आधुनिक भारतातील राजकीय विचारवंत, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव.

६. नरके हरी, (१९९३), महात्मा फुले साहित्य आणि विचार, महात्मा फुले चरित्र साधने प्रकाशन समिती महाराष्ट्र शासन, मुंबई.

७. संपादक फडके य. दि., (1991), महात्मा फुले समग्र वाङ:मय, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई.